झाली.

# स्वयंसेवी संस्था आणि पोलिसांकडून शाळांमधील विद्यार्थ्यांचे पथनाट्याद्वारे समुपदेशन

पुणे - पंख संस्था, खडक पोलीस स्टेशन व किकहिल फाउंडेशन यांच्या विद्यमाने जिजामाता मुलींची शाळा, महात्मा गांधी उर्दु विद्यालय व शासकीय उर्दु अध्यापिका विद्यालय येथे बालकांच्या सुरक्षिततेबाबत समुपदेशकांनी व्यसनावर आधारित पथनाट्य सादर केले. या पथनाट्यात व्यसनांमुळे निर्माण होणारे धोके सांगण्यात आले. पंख संस्थेच्या अध्यक्ष स्मिता आपटे यांनी मुलांशी संवाद साधून मुलांना व्यसनांमुळे निर्माण होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक, कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक धोके समजावून सांगितले व मुलांच्या शंकांचे निरसन केले. तसेच पंख संस्थेमार्फत बाल लैंगिक पोक्सो कायदा यावरही माहिती दिली. यावेळी प्रेम, मैत्री, आकर्षण यावर रोल प्ले सादर करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, जयंत हंचाटे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी इस्माईल शेख, पोलीस नाईक ढगे, पोलीस शिपाई सचिन माळी, भाग्यश्री येलाले, जिल्हा महिला बालविकास अंतर्गत बाल संरक्षण पथक मच्छिंद्र कदम, रेणुका गोसावी, विलास कदम आदी उपस्थित होते.